महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र. १४७७(२)/२०१९/चौदा-अ** **दिनांक:- ८ सप्टेंबर, २०२१**

**राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०१९**
**पदांच्या पसंतीक्रमाबाबतची घोषणा**
**पूर्व परीक्षा जाहिरात क्रमांक ५०/२०१८ व मुख्य परीक्षा जाहिरात क्रमांक ०७/२०१९**

**घोषणा**

प्रस्तुत परीक्षेचा सुधारित निकाल दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आला असून त्याअनुषंगाने नव्याने मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २५ व २६ ऑगस्ट, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षेच्या निकालाच्या अनुषंगाने दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणेत 'मुख्य परीक्षेच्या सुधारित निकालान्वये मुलाखतीसाठी नव्याने पात्र ठरलेल्या तसेच यापूर्वी मुलाखतीस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेकरिता अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम देण्याबाबत घोषित करण्यात आले होते. त्यानुसार उमेदवारांनी पसंतीक्रम सादर केले असले तरी दिनांक १९ जून, २०२० च्या अंतिम निकालात नावे समाविष्ट असलेल्या काही उमेदवारांनी सुधारित पसंतीक्रम सादर केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा उमेदवारांच्या बाबतीत प्रस्तुत परीक्षेच्या संदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या महिती / परीक्षा योजनेमधील परिच्छेद क्रमांक ६.५.३. नुसार मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे, असे ग्राहय धरून निकालाची अंतिम कार्यवाही करण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेचा निकाल अंतिम टप्प्यात असून पुढील आठवडाअखेर जाहीर करण्याचे नियोजित आहे.

उप सचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.